| MHNS240021902024 | **नियमित दिवाणी दावा क्र.४२४/२०२४ मधील नि.क्र.०५ वरील आदेश.** |
| --- | --- |
| | अशोक सहादु भामरे |
| | **विरूद्ध** |
| | दादाजी सहादु भामरे |

**निशाणी क्र.०५ वरील आदेश**

(आदेश पारीत दिनांक ३०.०६.२०२५)

प्रस्तुत दावा हा जाहीरनामा व निरंतर मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने या दाव्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (***यापुढे याचा उल्लेख 'संहिता' असा करण्यात आला आहे*** ) चे क्रम ३९, नियम १ व २ अन्वये दाखल केला असून या अर्जाव्दारे वादी हे प्रतिवादी विरूद्ध त्यांनी दाव्याच्या अंतीम निकालापावेतो तहसिलदार बागलाण यांच्याकडील वहिवाट दावा क्र.१४/२०२३ चे दि.१४/१०/२०२४ चे निकालपत्राच्या आधारे वादीच्या दावा मिळकत कलम १ मधील मिळकतीतुन प्रतिवादी यांनी नविन रस्ता तयार करु नये व वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करु नये अशा आशयाचा तुर्तातूर्त मनाई आदेश मागितलेला आहे. अर्जाच्या पुष्ठ्यर्थ वादीने त्यांचे शपथपत्र सादर केले आहे. प्रस्तुत आदेश हा वादीच्या नि.क्र.५ वरील अर्जावरच असल्याने वादीने अर्जात केलेल्या कथनांचा या ठिकाणी पुनुरुल्लेख टाळण्यासाठी पुन्हा उल्लेख करण्यात आलेला नाही.

**<u>दावा मिळकतीचे वर्णन :–</u>**

**०२.** मौजे पिंपळकोठे, ता.बागलाण, जिल्हा नाशिक येथील गट नं.३३०/१/२ चे ०हे.८२.५० आर क्षेत्र म्हणजे 'दावा मिळकत' होय.

**(येथून पुढे उपरोक्त वर्णनाच्या दावा मिळकतीस 'वाद मिळकत' म्हणून संबोधण्यात येते.)**

**०३.** प्रतिवादी यांनी नि.क्र.३९ वर सादर केलेल्या बचावपत्राव्दारे व खुलाश्याव्दारे त्यांनी वादीच्या दाव्यास व नि.क्र.५ वरील अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी हे सख्खे भाऊ आहेत. वादी आणि प्रतिवादी हे दोघे कै. सहादु वेडु भामरे यांची मुले असून, त्यांचे वडील, वडिलांचे भाऊ नारायण, पुंडलिक व चुलती सरस्वताबाई हे एकत्र कुटुंब पद्धतीने मौजे पिंपकोठे शिवारातील वडिलोपार्जित शेतजमीन खेडत होते. एकत्र कुटुंबातील शेतीवाटप दि. ०९/०१/१९९३ रोजी झाले व त्यानुसार गट नं. ३३०/१/१ क्षेत्र ०.८२.५० हेक्टर ही जमीन कै. सहादु भामरे यांना मिळाली असून, ती त्यांच्या मुलगा दादाजी (प्रतिवादी) यांच्या नावे करण्यात आली. त्यास अनुसरून फेरफार नोंद क्र. ५२४ प्रमाणित झाली. त्यानंतर कै. सहादु यांना मोबदल्यात सरस्वताबाई यांच्या नावे असलेली गट नं. ३३०/१/२ ही जमीन मिळाली. सदर जमिनीच्या पूर्वेला रस्ता असून ती जमीन प्रत्यक्षात वादी अशोक यांच्या नावे दि.२४/०४/२००१ रोजी देण्यात आली व त्याबाबत फेरफार नोंद क्र.८२९ करण्यात आली. सदर दोन्ही जमिनी पूर्वी एकत्र कुटुंबाकडून खेडत होत्या आणि त्या जमिनी कै. सहादु यांना वाटपाद्वारे मिळालेल्या होत्या. त्यामुळे त्या त्यावेळी स्वतंत्र रस्त्याची नोंद करण्याची गरज भासली नाही.

**०४.** कै. सहादु हे सन २००३ पर्यंत एकत्रित दोन्ही जमिनी खेडत होते. त्यानंतर त्यांनी त्यांच्या मुलांमध्ये सरस–निरस वाटप केले. त्यावेळी प्रतिवादीस गट नं. ३३०/१/१ व वादीस गट नं. ३३०/१/२ देण्यात आला. तसेच, प्रतिवादीस वादीच्या जमिनीमधून १० फूट रुंदीचा रस्ता देण्यात आला, जो पांडुरंग काशीराम आहिरे यांच्या शेतालगत पूर्व–पश्चिम दिशेने होता. त्याचे मोबदल्यात प्रतिवादीने गट ३३०/१/२ मधील एकत्र कुटुंबाची विहीर वादीस कायमस्वरूपी देण्यात आली. सदर वाटपाबाबत स्मरणयादी तयार करण्यात आली असून, त्यावर वादी, प्रतिवादी, कै. सहादु व इतर साक्षीदारांच्या सह्या आहेत. सदर वाटपाचा मूळ दस्त वादीकडे असून त्याची प्रत प्रतिवादीकडे आहे. सदर वाटणीनंतर प्रतिवादी नोकरीनिमित्त बाहेरगावी राहत असल्यामुळे वादीने त्याची शेती केली. प्रतिवादीची शिक्षक म्हणून बदली बागलाण तालुक्यात झाल्याने तो स्वतः शेती करू लागला. त्यामुळे वादीने कुरापती काढून प्रतिवादीस जमिन खेडण्यास व रस्ता वापरण्यास अडथळा निर्माण केला. त्यामुळे प्रतिवादीने तहसिलदार बागलाण यांच्या न्यायालयात वहिवाट अर्ज क्र. १९/२०१९ दाखल केला. परंतु वादीने पुर्वी दिलेला रस्ता नष्ट केल्यामुळे रस्ता प्रत्यक्षात दिसला नाही व त्यामुळे केस नामंजूर झाली.

**०५.** प्रतिवादीस त्याची मिळकत कसण्यास रस्ता नसल्याने त्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४३ अंतर्गत वहिवाट अर्ज नं. १४/२०२३ दाखल केला. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.२३/०७/२०२४ रोजी तहसिलदार यांनी स्थळ निरीक्षण करून

पंचनामा केला व त्यामध्ये गट नं. ३३०/१/२ च्या दक्षिण बाजूने प्रतिवादीस १० फूट रुंदीचा रस्ता देणे योग्य असल्याचे नमूद केले. अशा प्रकारे प्रतिवादीचा वहिवाटीचा हक्क मान्य करून वहिवाट अर्ज मंजूर करण्यात आला.

**०६.** वादी व प्रतिवादी यांच्यातील जमिनी वडिलोपार्जित असून, त्यात समान वाटप करण्यात आलेले आहे. वादीच्या शेताला रस्ता लागून असून प्रतिवादीची जमीन आतमध्ये आहे. सदर मिळकतीमध्ये जाण्यासाठी वडिलांनी दिलेला १० फूट रस्ता व प्रतिवादीचा वापराचा हक्क लेखी दस्ताऐवजात नमूद आहे. प्रतिवादी यांनी त्याचे क्षेत्र वादीस विकावे या कारणाने वादीने प्रतिवादीस त्रास देवुन रस्ता बंद करुन शेती पडीत ठेवण्यास भाग पाडले त्यामुळे प्रतिवादीचे नुकसान झाले व होत आहे. वादी यांना प्रथमदर्शनी दावा तसेच न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने नाही. सदर प्रतिवादीविरुध्द मनाई आदेश पारित केल्यास त्यास त्याची मिळकत उपभोगता येणार नाही व त्याचेच अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**०७.** वादीतर्फे श्रीमती. एस.डी. चंद्रात्रे व प्रतिवादींतर्फे श्री. एस.आर. आहिरे यांनी केलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे उपस्थित झाले. मी, त्यांना खालीलप्रमाणे सकारण निष्कर्ष नोंदविला आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी सकृतर्शनी दावा त्यांच्या बाजूने आहे असे सिद्ध करतात काय ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ०२. | वादी न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने झुकत आहे असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०३. | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश न मिळाल्यास त्यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतात काय ? | **नकारार्थी** |
| ०४. | आदेश काय ? | **अर्ज नामंजुर करण्यात येतो.** |

**वादीतर्फे दाखल करण्यात आलेले कागदपत्रेः–**

**०८.** वादीने नि.क्र.०३ लगत अ.क्र.१ व २ कडे गट क्र.३३०/१/१ व गट क्र.३३०/१/२ चा सातबारा उतारा, अनु.क्र.०३ ते ०५ कडे फेरफार नोंद क्र.१६१, ५२४ व ८२९ ची प्रत, अनु.क्र.०६ व ०७ कडे तहसिलदार यांचेकडील वहिवाट दावा क्र. १९/२०१९ व क्र.१४/२०२३ ची प्रत, अनु.क्र.०८ कडे नकाशा तसेच नि.क्र.५३ कडे भिला दौलत भामरे यांचे शपथपत्र दाखल केले. प्रतिवादीने नि.क्र.५५ लगत अनु. क्र.०१ कडे वाहिवाट दावा क्र.१४/२०२३ मधील निकालपत्रक, अनु.क्र.२ कडे वाटणी पत्रक, अनु.क्र.३ पंचनामा, अनु.क्र.४ कडे कच्चा नकाशा, अनु.क्र.५ वहिवाट स्थळ नकाशा इ. कागदपत्रे सादर केली आहेत.

:: **का र ण मी मां सा** ::

**मुद्दा क्र.०१ बाबत :–**

**०९.** प्रस्तुत वाद प्रश्नात समाविष्ट असणारा पहिला घटक म्हणजे सकृत दर्शनी केस (prima–facie case) वादीच्या बाजुने आहे किंवा नाही. तुर्तातुर्त मनाई हुकूम

मिळणेसाठी वादीस प्रथमदर्शनी दावा त्यांच्या बाजूने असून न्यायाचा समतोल त्याच्या बाजूनेच आहे हे सिद्ध करुन प्रतिवादी विरुद्ध मनाई हुकूम न दिल्यास त्याचेच अपरिमित नुकसान होणार असून प्रतिवादीस जास्त हाणी होणार नाही या तीन्ही बाबी सिद्ध करणे आवश्यक असते.

**१०.** प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांना तुर्तातुर्त आदेश मिळविणे कामी प्रतिवादीस त्यांची मिळकत वहिवाटण्याकरिता पर्यायी रस्ता उपलब्ध असुन वादी यांच्या क्षेत्रातुन रस्ता दिल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे हि बाब सिध्द करावी लागले. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम कलम १४३ नुसार दाखल केलेल्या वहिवाट अर्ज क्र.१४/२०२३ मध्ये तहसिलदार बागलाण यांच्याकडुन बेकायदेशिरपणे आदेश प्राप्त केला आहे. प्रतिवादी यांची महसुल प्रकरणे पाहिली असता, त्यामध्ये त्यांनी त्यांना रस्ता होता व तो वादीने अडविला अशा अशयाची प्रकरणे दाखल केलेली आहे. कलम १४३ अंतर्गत नविन रस्ता द्यावयाचा असेल तरच सदर कलमाखाली अर्ज सादर करता येतो, अन्यथा मामलेदार कोर्ट अॅक्ट कलम ५ नुसार तरतुद आहे. परंतु, वादी यांनी तहसिलदार बागलाण यांच्याकडे कलम १४३ अंतर्गत अर्ज केल्याने अर्ज व आदेश बेकायदेशिर आहे. सदर कथनाच्या पुष्ठ्यार्थ वादी यांनी मा. मुंबई उच्च् न्यायालय, यांचेकडील रिट याचिका क्र.७८४४/२०२४ अभय सोमा अभिवंत वि. महाराष्ट्र राज्य या न्यायनिवाड्यातील तत्वावर भिस्त ठेवलेली आहे. याउलट प्रतिवादीचे असे कथन आहे की,

पुर्वी वहिवाटीकरिता रस्ता होता व तो वादीने अडविला त्यामुळे त्यांनी मामलेदार कोर्ट अॅक्ट कलम ५ नुसार दाद मागितली होती. परंतु, त्यानंतर वादी यांनी सदर रस्ता नष्ट केल्याने रस्ता अस्थित्वात राहिला नसल्याने त्यांनी कलम १४३ अंतर्गत अर्ज सादर केला होता व त्यामधील न्यायनिर्णय योग्य आहे.

**११.** एकंदरीतच उभयपक्षकारांचे परस्पर विरोधी कथन तसेच अभिलेखावरील कागदपत्र पाहता वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे भाउबंध असुन गट क्र.३३०/१/१ व ३३०/१/२ हि मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मिळकत होती व त्यामध्ये त्यांचे वाटप झाले ही बाब उभय पक्षकारांना मान्य व कबुल आहे. प्रतिवादीस पर्यायी रस्ता आहे ही बाब दर्शविण्याकरिता वादी यांनी अभिलेखावर वहिवाट अर्ज क्र.१९/२०१९ मधील स्थळ निरिक्षण पंचनामा व इतर कागदांवर भिस्त ठेवलेली आहे. सदर कागदपत्र पाहता, वहिवाट अर्ज क्र.१९/२०१९ नुसार या वादीने रस्ता बंद केल्याने प्रतिवादीने सदर अर्ज दाखल केला होता. सदर अर्जातील स्थळ निरिक्षण पंचनामा पाहता या प्रतिवादीस वादी यांच्या मिळकतीतुन गट क्र.३२८/२ लगत रस्ता आहे. परंतु पुढे प्रतिवादीस त्याच्या मिळकतीत जाण्याकरिता अन्य गटातुन जावे लागत असल्याचे दिसुन येत आहे. परंतु वहिवाट अर्ज क्र.१४/२०२३ मधील नकाशा पाहता त्यामध्ये मुख्य शिवपांधी रस्त्यालगत वादी यांचे गट क्र.३३०/१/२ हि मिळकत असल्याचे व त्यानंतर पश्चिम बाजुस प्रतिवादी यांची गट क्र.३३०/१/१ हि मिळकत असल्याचे दिसुन येत आहे. सदर स्थळ निरिक्षण पंचनामा

पाहिला असता प्रतिवादी यांना त्यांची मिळकत वहिवाटण्याकरिता इतर कोणताही पर्यायी रस्ता दिसुन येत नाही. त्यामुळे सद्यस्थितीत तहसिलदार बागलाण यांनी प्रतिवादीस दिलेला रस्ता योग्य दिसुन येत आहे. सदर परिस्थीतीमध्ये प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश दिल्यास त्यास त्याची मिळकत उपभोगता येणार नाही व त्याचेच वादीपेक्षा जास्त प्रमाणात नुकसान होणार आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. मी वादीतर्फे दाखल केलेल्या वर नमुद न्यायनिवाड्यातील तत्व वाचुन पाहिले. वहिवाट अर्ज क्र.१४/२०२३ मधील कथन पाहता प्रतिवादी यांनी सदर अर्जामध्ये त्यांना रस्ता उपलब्ध नसल्याने त्यांनी सदर अर्ज दाखल केल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वादी यांनी दाखल केलेल्या वर नमुद न्यायनिवाड्याचा संपुर्ण आदर राखुन त्यामधील तत्व या ठिकाणी वादीच्या हक्कामध्ये लागु होत नाही असे माझे मत आहे. त्यामुळे वरील विवेचनार्थ वादी यांना सकृत दर्शनी दावा आहे हि बाब सिध्द करता आली नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.०१ करिता नकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ०२ बाबत</u> :–**

**१२.** प्रस्तुत वाद प्रश्नात समाविष्ट असलेला दुसरा घटक म्हणजे न्यायाचा समतोल (balance of convenience) म्हणजेच तुलनात्मक अपाय अथवा पक्षकाराची होणारी गैरसोय होय. न्यायाचा समतोल कोणाच्या बाजूने आहे हे निश्चित करण्यासाठी अंतरिम मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर केल्यास वादीस किती अपाय होईल याबाबी सह सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीस किती अपाय होईल याबाबीचा देखील विचार करणे आवश्यक असते.

प्रस्तुत **वादप्रश्न क्र.०१** चे निष्कर्षानुसार वादी सकृत दर्शनी केस त्यांच्या बाजुने असल्याचे शाबीत करण्यास असमर्थ ठरले आहेत. सध्यस्थितीत प्रतिवादी यांच्याविरूद्ध मनाई आदेश पारीत केला तर वादी पेक्षा जास्त प्रमाणात प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचा समतोल हा वादीच्या लाभात असल्याचे शाबीत करणेस वादीस अपयश आले असल्याने मी, **मुद्दा क्र.०२ करीता नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ०३ बाबत :–**

**१३.** प्रस्तुत वाद प्रश्नात समाविष्ट असणारा तिसरा घटक अपरिमित नुकसान (irreparable loss) म्हणजे पैशाने कधीही न भरुन येणारी हाणी होय. वादी सकृत दर्शनी दावा त्याचे बाजुने तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध करण्यास असमर्थ ठरले आहेत. त्यामुळे, अर्ज मंजुर केल्यास वादी पेक्षा जास्त प्रमाणात हाणी प्रतिवादी यांना होईल. म्हणुन प्रस्तुत अर्ज नामंजुर केलेस वादीचे अपरिमित असे नुकसान होणार नाही. वरील कारणास्तव मी, **मुद्दा क्र.०३ करीता नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.०४ बाबत :–**

**१४.** सकृत दर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमित नुकसान या तीन्ही संज्ञा केवळ अलंकारीक भाषेचा नमुना नसुन सदर तीन्ही संज्ञांना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सर्व तिन्ही संज्ञा वादीच्या लाभात असल्याने शाबीत करण्यास वादीस अपयश आले असल्याने वाद प्रश्न ०१ ते ०३ चे निष्कर्ष त्यानुसार नकारार्थी नोंदविण्यात आले

आहेत. सबब, वरील विवेचनार्थ मी, **मुद्दा क्र.०४** करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

**:: आ दे श ::**

**०१.** अर्ज निशाणी क्र.०५ नामंजुर करण्यात येतो.

**०२.** अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करावा.

SHIPKULE CHARUDATTA
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2025.06.30 17:36:02 +0530

**ठिकाण : सटाणा.** **( चारुदत्त उद्धव शिपकुले )**
**दिनांक: ३०/०६/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सटाणा.**